## प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

दिनांक : २९.१२.२०२०

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) सुरेश संपतराव मनगटे, वय ५३ वर्षे, पद : वनपाल, क्षेत्र सहायक, माळेगांव वर्तुळ (मार्डी) ता.तिवसा, जि.अमरावती<br>२) प्रभुदयाल प्रकाशराव चौधरी, वय ३९ वर्षे, पद : वनरक्षक, श्रेत्र सहायक, माळेगांव वर्तुळ, (मार्डी) ता.तिवसा, जि.अमरावती<br>३) संजय वासुदेवराव माहोरे, वय ५६वर्षे, पद : वनमजुर, क्षेत्र सहायक, माळेगांव वर्तुळ (मार्डी) ता.तिवसा, जि.अमरावती<br>४) प्रशांत राजेंद्रराव भडके, वय ३७ वर्षे, व्यवसाय : व्यापार, रा.सुरवाडी, ता.तिवसा, जि.अमरावती (खाजगी इसम) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक २८.१२.२०२० चे १७.४० वा. ते १८.४५ वा.दरम्यान |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | १,००,०००/— रुपये |
| ५ | घटनास्थळ | चिखली फाटा, मार्डी ते व—हा रोड, ता.तिवसा, जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक २३.१२.२०२० रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २४/१२/२०२० रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना वनविभाग कार्यालय मार्डी येथील वनपाल श्री.मनगटे व वनरक्षक श्री.चौधरी यांनी तक्रारदार यांचे ग्राम मार्डी, ता.तिवसा, जि. अमरावती येथील शेता मध्ये जे.सी.बी. ने केलेल्या खोदकाम हे वन खात्याचे जमीनीवर असल्याचे सांगुन त्यासंबंधी तक्रारदार यांचे विरुध्द कोणतीही कार्यवाही न करणे करीता व त्यांचे कामावरील जप्त करण्यात आलेला जे.सी.बी. सोडण्याकरीता १,००,०००/— रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले तसेच ई.लो.से.क्र.३ माहोरे, वनमजुर यांनी तक्रारदार यांना लाच देणेबाबत प्रोत्साहन दिले.

त्यानंतर दिनांक २८.०८.२०२० रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र.१ मनगटे, वनपाल यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारणेबाबत आलोसे क्र.२ चौधरी, वनरक्षक यांना सांगितले असता त्यांनी आरोपी क्र.४ भडके खाजगी इसम याचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्याने रंगेहाथ पकडण्यात आले आहे. वरुन नमुद चारही आरोपींविरुध्द पो.स्टे.कु—हा, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, स.पो.उ.नि.श्रीकृष्ण तालन, पो.ना.सुनिल व—हाडे, पो.ना.युवराज राठोड, पो.ना.संतोष नागे, पो.कॉ.अभय वाघ, पो.कॉ.तुषार देशमुख, पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,
ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

टोल फ्री कमांक : १०६४

दुरध्वनी कमांक : ०७२१—२५५२३५५,२५५३०५५

(गजानन पडघन)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९९२३७३८१००

कार्यालय पोलीस उप-अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

Scanned with CamScanner